"Knowledge Scholar"
An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research
Volume: 02, Issue: 06, Nov.-Dec. 2015 *eISSN NO. 2394-5362*
Impact Factor (IIFS) - 0.776

लोकप्रशासनातील जनसहभागाची आवश्यकता आणि मर्यादा

डॉ. वाय. के. भादे

सहाय्यक प्राध्यापक,

लोकप्रशासन विभाग,

विवेकानंद कला, सरदार दलिपसिंग वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

औरंगाबाद.

प्रस्तावना

लोकशाही शासन पद्धतीमध्ये लोकप्रशासनाच्या कार्यात नागरिकांचा सहभाग असणे आवश्यक मानले जाते. स्वयंशासनाचा आधार लोकांच्या सहभागावरून ठरवला जात असतो. लोकप्राशसनास गतिशील करावयाचे असल्यास प्रशासकीय कार्यप्रक्रियेतील जनसहभाग आणि सहभागाची गुणवत्ता वाढविणे आवश्यक आहे. लोकप्रशासनाची जटील प्रक्रिया सुलभ करण्यासाठी प्रशासन आणि जनता यांच्यात सुसंवाद असणे अत्यंत आवश्यक असते. मुख्यतः कल्याणकारी राज्याच्या पार्श्वभूमिवर जनसहभागाची गरज अधिकच तिव्र झाली आहे. वास्तविकतः नागरिक हा लोकप्रशासनाचा केंद्रबिदू आहे. नागरिकांसाठीच लोकप्रशासन कार्य करीत असते. अगदी प्राचीन ग्रीक काळापासून लोकांच्या शासनातील सहभागाला महत्त्व देण्यात आले आहे. आजच्या अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधिक लोकशाहीमध्ये लोकांच्या प्रत्यक्ष सहभागावर मर्यादा आल्या असल्या तरी राजकारणात आणि प्रशासनात तसेच धोरण निर्धारण वा धोरणांची अंमलबजावणी त्यात लोकांचा सहभाग असणे आवश्यक मानले जाते. लोकांचा सहभाग हा लोकशाहीच्या यशाचा निकष मानला जातो. लोकांच्या सहभागामुळे शासन आणि प्रशासनाला भक्कम आधार मिळतो आणि त्याचबरोबर शासनावर आणि प्रशासनावर लोकांचे नियंत्रणसुद्धा राहते. तसेच लोकांना आपल्या जीवनाशी निगडित सर्व बाबींविषयीचे निर्णय घेण्याची संधी मिळते, त्याचबरोबर प्रशासनाच्या कृतीविषयी आपल्या भावना व्यक्त करणे शक्य होते. शासन-जनता

http://www.ksijmr.com

यांच्यातील सुसंवाद यात अपेक्षित आहे. त्याच्या परिणामी शासनाला लोकाभिमुख राहून कार्य करणे भाग पडते. एका अर्थाने प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे प्रशासनाला जनतेच्या प्रती जबाबदार किंवा उत्तरदायी बनविण्यासाठी आणि प्रशासनावर जनतेचे नियंत्रण राहावे, यासाठी जनतेचा सहभाग असणे आवश्यक झाले आहे, नव्हे तर सुप्रशासनाची ती गरज असते. साहजिकच जनतेसाठी ध्येय धोरण राबविण्याची जबाबदारी लोकप्रशासनाची झाली आहे. त्यामुळे लोकप्रशासनाला गतीशील बनविणे आवश्यक आहे.

लोकशाही व्यवस्थेत सामान्य नागरिकांच्या सहभागाला महत्त्वाचे मानले जाते. राजकारणात नागरिकांचा सहभाग म्हणजेच लोकशाही असे म्हटले जाते. परंतु त्याच बरोबर प्रशासनातील सहभागी महत्त्वाचा असतो. लोकशाही व्यवस्थेत लोकांनी निवडलेले प्रतिनिधी प्रशासन चालवतात. मंत्री म्हणून कार्य करताना राजकारणापेक्षा प्रशासन जास्त महत्त्वाचे ठरते. थोडक्यात निर्णय घेणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे, या दोन्ही प्रक्रियांमध्ये लोकांचा सहभाग असणे आवश्यक मानले जाते. म्हणजे लोकशाही व्यवस्थेत प्रशासनाचेसुद्धा लोकशाहीकरण व्हावे लागते. सर्व लोकशाही राष्ट्रात शासन व्यवस्था जनतेचे प्रतिनिधित्व करते आणि प्रशासन व्यवस्था जनतेच्या कल्याणाचे आणि जनतेच्या सेवेचे साधन असते. अशा परिस्थितीत जनतेच्या सहभागाशिवाय शासन किंवा प्रशासन चालवणे अशक्य असते. लोकशाहीमध्ये जनतेचा सहभाग महत्त्वाचा असतो, हे सर्वमान्य झाले आहे. आल्मंडने (Almond) लोकशाही व्यवस्थेला 'सहभागात्मक संस्कृती' (Praticipative Culture) असे म्हटले आहे. जनतेच्या अर्थपूर्ण सहभागाशिवाय आणि शासन आणि जनता यांच्यामध्ये पूर्ण संसूचन असल्याशिवाय लोकशाही व्यवस्था यशस्वी होऊ शकत नाही. विकसित देशात अशा प्रकारच्या जनतेच्या सहभागाची साधने विकसित झोलेली आहेत; परंतु भारतासारख्या विकसनशील देशात प्रशासनाच्या कार्यात जनतेचा सहभाग फारच कमी असतो. कारण विकसनशील देशातील बहुसंख्य जनता लोकशाही प्रती अजागरुक असते. शासन-प्रशासनाच्या कार्यात कशाप्रकारे सहभागी व्हावे आणि त्यासाठी काय करावे, याचे योग्य मार्गदर्शन मिळत नाही. जनतेत साक्षरतेचे प्रमाण कमी असते. जनता आणि प्रशासन यांच्यात खूप अंतर असते. शासन आणि प्रशासक यांची संस्कृती वेगळी आणि सामान्य जनतेची संस्कृती वेगळी असते. विकास आणि परिवर्तन याविषयीच्या सामान्य जनतेच्या आशा-आकांक्षा, वेगवेगळ्या असतात तर शासनकर्ते आणि

अधिकारवर्ग यांच्या अपेक्षा वेगळ्या असतात. त्यांच्यात आणि जनतेत योग्य आणि अर्थपूर्ण संसूचन किंवा संवाद प्रस्थापित होत नाही. या सर्व कारणांमुळे या देशातील प्रशासनात जनतेचा सहभाग खऱ्या अर्थाने नसतो. या देशात जोपर्यंत जास्तीत जास्त जनता जास्तीत जास्त प्रमाणात सहभागी होत नाही, तोपर्यंत खऱ्या अर्थाने विकासाच्या प्रक्रियेला गती येणार नाही. कारण शासनाकडून अपेक्षित कार्य करवून घेण्यासाठी आणि आपल्या मागण्या शासनापर्यंत पोहचविण्यासाठी जनसहभाग आवश्यक असतो.

लोकप्रशासन जनतेसाठी अस्तित्वात असते. जनता आणि प्रशासन यांच्यात जवळचे संबंध असतात. जनतेच्या इच्छा-आकांक्षाचे प्रतिनिधित्व धोरण, योजना, कार्यक्रम आणि कायद्याद्वारे राज्यकर्ते करतात, तर लोकप्रशासक त्या कायद्याची योग्य अंमलबजावणी करून जनतेच्या मागण्या आणि आकांक्षांची पूर्तता करतात. जनतेच्या स्वप्नांना साकार करण्याचे कार्य प्रशासक करतात. म्हणूनच प्रशासनाला जनतेच्या अपेक्षांकडे दुलर्क्ष करून चालत नाही. जनतेशी सतत संपर्क ठेवणे, जनतेला माहिती देणे, त्यांच्या अपेक्षा जाणून घेणे आणि त्यांच्या अपेक्षाप्रमाणे कार्य करणे ही लोकप्रशासनाची आद्य जबाबदारी असते. प्रशासनाच्या निर्णयांच्या किंवा प्रशासकीय कृतींच्या पाठीशी जनसहमती किंवा जनतेचा पाठिंबा नसेल तर कोणतेही प्रशासन यशस्वी होऊ शकत नाही. हे मान्य करावे लागते. लोकशाही व्यवस्थेत जनतेचे सार्वभौमत्व असल्यामुळे लोकांकडे दुर्लक्ष करून लोकप्रशासन कार्य करूच शकत नाहीत. सहाजिकच जनसहभाग हा लोकशाही लोकप्रशासनातील केंद्रबिदू ठरतो.

वर्तमान काळात जगामध्ये राज्य व्यवस्थेचे अनेक प्रारुप आहेत. मात्र, बहुतांश आधुनिक लोकशाही राज्यांनी "कल्याणकारी राज्याची" संकल्पना स्वीकारलेली आहे. त्यामुळे शासनाला लोककल्याणाची विविध कार्ये प्राथमिकतेने करावीच लागतात. म्हणजेच प्रशासकीय यंत्रणांच्याद्वारे सर्व लोककल्याणकारी धोरणांची अंमलबजावणी केली जात असते. त्यामुळे प्रशासनाची व्याप्ती आणि त्याच्यासमोरील तणाव व आव्हाने खुप वाढले आहेत. प्रशासकीय संघटना आणि संस्थांची गुणात्मक आणि संख्यात्मक वाढ झाली आहे. प्रशासकीय संस्थेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्यासुद्धा सर्वच देशात अनेक पटींनी वाढली आहे. आज प्रशासकीय कार्याच्या व्याप्तीतून मानवीजीवनाचे कोणतेही क्षेत्र सुटलेले नाही. प्रत्येक कार्यासाठी आज नागरिकाला

http://www.ksijmr.com

शासनाकडे म्हणजे पर्यायाने प्रशासनाकडे यावे लागते. त्यामुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यात दैनंदिन स्वरूपाचे संबंध येत असतात. करीता हे संबंध सदृढ व निकोप असणे आवश्यक असते. आधुनिक समाजात अनेक सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक संघटना सेवाभाव वा हितसंबंध जोपासण्यासाठी कार्य करीत असतात. प्रत्येक नागरिक कोणत्या ना कोणत्या संघटनेचा सदस्य असतो. प्रत्येक संघटनेचे ध्येय आणि कार्यपद्धती वेगळी असते, पण प्रशासनाशी त्यांचे संबंध या ना त्या निमित्ताने येतातच. अनेक संघटना प्रशासनावर निरनिराळ्या मार्गांने दबाव आणून आपापली कामे करून घेत असतात. प्रशासनाला त्या सर्व संघटनांच्या मागण्या आणि तक्रारी समजून घेणे आवश्यक असते. त्याकडे दुर्लक्ष केल्यास जनतेच्या सामूहिक विरोधाला किंवा जनक्षोभाला सामोरे जावे लागते. असे प्रशासन जनतेच्या उचित आणि न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष करीत आहे, जनतेच्या तक्रारी सोडवत नाही किंवा ते लोकविरोधी आहे, अशी टीका केली जाते. त्याचा विपरीत परिणाम लोकमतावर पडतो आणि प्रशासनाविरोधी लोकमत तयार झाल्यामुळे पुढच्या निवडणुकीत शासनकर्त्या पक्षावर राग काढला जातो आणि त्या पक्षाचा पराभव होतो. राजकीय पक्षांना प्रशासनाच्या चुकांचे परिणाम भोगावे लागतात. कारण प्रशासनाला दिशा देण्यासाठी तसेच नियंत्रणासाठी त्यांनाच जबाबदार धरले जाते. सहाजिकच ही संपूर्ण प्रक्रिया प्रभावी होण्यासाठी परिणामकारक जनसहभाग निर्माण होणे आगत्यपूर्ण आहे.

जनतेच्या सहभागाची आवश्यकता

लोकशाहीतील प्रशासनाच्या कार्य अंमलबजावणीतील यशापयश त्या देशातील जनसहभागाचा स्वरुपावर अवलंबून असते. लोकशाही फक्त एक शासन व्यवस्था नसून ती एक जीवनपद्धती आहे. लोकशाहीची जीवनमूल्ये प्रस्थापित करण्यासाठी सर्व जनतेचा सहभाग असणे आवश्यक असते. म्हणूनच लोकशाहीला सहभागात्मक संस्कृती (Praticipative Culture) असे म्हटले जाते. वास्तवतः कोणत्याही प्रकारच्या शासन व्यवस्थेच्या स्थैर्यासाठी आणि यशस्वीतेसाठी जनतेचा पाठिंबा आणि जनतेचा सहभाग आवश्यक असतो. त्याचबरोबर आधुनिक युगात प्रशासकीय संस्था आणि संघटनांचे प्रस्थ अत्याधिक वाढले आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या हातात मोठ्या प्रमाणात सत्ता आणि अधिकार दिलेले असतात. त्या अधिकारांचा दुरूपयोग

आणि अतिरेक होण्याची शक्यता असते. प्रशासकीय यंत्रणेद्वारे नागरिकांच्या स्वातंत्र्याची आणि हक्कांची पायमल्ली होऊ शकते. प्रशासनात नागरिकांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग असल्यास प्रशासनावर नियंत्रण राहते.

प्रभावी जनसहभाग नसल्यास समाजातील प्रस्थापीत वर्ग प्रशासनावर प्रभाव पाडतात. आपले हितसंबंध जपण्यासाठी आणि आपल्या स्वार्थसिद्धीसाठी हे शक्तीशाली घटक किंवा समूह आपल्या प्रभावाचा वापर करून प्रशासनावर दबाव आणतात आणि सर्व फायदे स्वतः घेतात. त्यामुळे सामान्य नागरिकांचे अतोनात नुकसान होते आणि त्यांच्या हिताकडे पूर्णतः दुर्लक्ष होते. त्यांच्यावर अन्याय होतो, हे सर्व टाळण्यासाठी प्रशासनात जनतेचा सहभाग असणे आवश्यक असते. त्यामुळे सामान्यांचे हित साधले जाते आणि सर्वांना न्याय मिळतो.

विकसनशील राष्ट्रांमध्ये सामाजिक, आर्थिक राजकीय परिवर्तनाची सर्व जबाबदारी लोकप्रशासनावर असते; परंतु लोकप्रशासन व्यवस्था जनतेच्या समस्या आणि इच्छा-आकांक्षा समजण्यात काहिसे असमर्थ असते. त्यामुळे विकासाच्या चांगल्या चांगल्या योजनासुद्धा अमलात येऊ शकत नाहीत. प्रशासनात जनतेचा सहभाग असल्यास योजना योग्य प्रकारे राबविल्या जाऊ शकतात आणि प्रशासनाला जनतेच्या गाऱ्हाणी आणि तक्रारी कळत असतात. त्यासाठीच जनतेचा पाठिंबा, जनतेचे सहकार्य आणि जनतेचा सहभाग असणे विकास कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अपरिहार्य असते.

शासनाच्या धोरणांचे यश प्रशासनाच्या अंमलबजावणीस जनतेने दिलेल्या प्रतिसादावर अवलंबून असते. कोणत्याही शासकीय आणि प्रशासकीय संस्थेच्या यशस्वीतेसाठी नागरिकांचा सहभाग आणि पाठिंबा जसा महत्त्वाचा असतो, तसेच त्यांच्यावर नियंत्रणसुद्धा आवश्यक असते. म्हणजे जनतेच्या सहभागामुळे प्रशासनाला आपल्या कार्यात जनतेचे पाठबळही मिळते आणि त्यांच्यावर जनतेचे नियंत्रणही राहते. त्यामुळे नागरिकांना प्रत्यक्ष प्रशासनात सहभागी होण्याची संधी तर मिळतेच; पण त्याचबरोबर आपल्या असमाधानाला, तक्रारींना प्रशासनापर्यंत पाहोचवणेसुद्धा शक्य होते. तक्रारींचे निराकरण करून घेण्याची तसेच आपल्याला अपेक्षित असलेली कामे प्रशासनाकडून करून घेण्याची शक्ती प्राप्त होते. लोकशाहीत सामान्य नागरिकाला शासन व्यवस्थेच्या सर्व कार्यात सहभागी होण्याची संधी मिळाल्याने समाधान मिळते. त्यांचे प्रशासनावरील विश्वास दृढ होतो.

लोकप्रशासनातीत जनतेच्या सहभागाची विविध स्वरुपे दिसून येतात. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असू शकतो, तसेच तो औपचारिक किंवा अनौपचारिक स्वरूपाचासुद्धा असू शकतो. जनतेचा सहभाग धोरणानिश्चितीच्या प्रक्रियेत किंवा धोरणांच्या अंमलबजावणीच्या वेळीही असू शकतो. तसेच उपरोक्षपणे फक्त दूरून अवलोकन करून आपल्या प्रतिक्रया नोंदवून किंवा तक्रारी मांडूनसुद्धा जनता प्रशासनात अप्रत्यक्षपणे सहभागी होऊ शकते. अर्थात असा सहभाग टीकाकाराच्या स्वरुपात असतो. जनतेचा सहभाग स्वयंस्फूर्त असू शकतो किंवा शासनप्रेरितही असू शकतो. त्याचप्रमाणे नागरिकांना वैयक्तिक पातळीवर प्रशासनात सहभागी होता येते किंवा संघटितरित्याही एखाद्या हितसंबंधी दबाव गटाच्या वतीने सहभागी होता येते. जनसहभाग अनेक भागांनी होत असतो. सामान्य नागरिक आपल्या राजकीय हक्कांचा वापर करतो आणि मतदान करतो, तेव्हा तो आपल्या इच्छेने शासन निवडतो आणि त्यात सहभागी होतो. जेव्हा एखादा नागरिक जनप्रतिनिधी म्हणून शासनात मंत्री किंवा पदधिकारी बनून शासन चालवतो, तेव्हा तो सामान्य जनतेच्या वतीने प्रशासनात सहभागी होत असतो. राजकीय पक्ष, दबाव गट, स्वयंसेवी संघटना आणि व्यावसायिक संस्थासुद्धा संघटितरीत्या प्रशासनावर प्रभाव पाडीत असतात आणि त्यांचे प्रतिनिधी प्रशासकीय कार्यात सहभागीसुद्धा होत राहतात. विविध विकास योजनांच्या आखणीसाठी, कार्यक्रम तयार करण्यासाठी विकास कार्यक्रमांचे मूल्यमापन करण्यासाठी किंवा शासनाला सल्ला देण्यासाठी अनेक समित्या आणि उपसमित्या नेमल्या जातात. या समित्यांच्या कार्याद्वारे सामान्य नागरिकांचा प्रशासनात प्रभावी सहभाग तर असतोच; पण तयाचबरोबर प्रशासनावर जनतेचा अंकुशसुद्धा ठेवला जातो. अनेकदा प्रशासन योग्य कार्य करीत आहे किंवा नाही यावर देखरेख ठेवण्यासाठी दक्षता समित्या नेमल्या जातात. या समित्यातसुद्धा जनतेचे भिन्न क्षेत्रातील सदस्य असतात. असा जनसहभाग प्रशासनाच्या कार्याला योग्य दिशा प्रदान करीत असतो. त्याचबरोबर जनतेचा प्रशासनातील अप्रत्यक्ष सहभागाचे प्रभावी साधन म्हणजे वृत्तपत्र होय. वृत्तपत्रातून आपल्या समस्या, गाऱ्हाणी आणि विचार व्यक्त करून प्रशासनावर अप्रत्यक्षपणे प्रभाव पाडण्याचे कार्य जनता करीत असते. वृत्तपत्रातून आलेल्या तक्रारींकडे प्रशासनाला दुर्लक्ष करता येत नसते. त्याची दखल घेऊन प्रशासनाला योग्य त्या उपाययोजना आणि सुधारणा घडवून आणाव्या लागतात. त्याचबरोबर नागरिकांच्या गट किंवा प्रतिनिधी मंडळ संबंधित अधिकाऱ्यांना भेटून

आपल्या भावना किंवा विचार व्यक्त करतात, तेव्हा ते एका अर्थाने प्रशासनाला प्रभावित करतात आणि हे एक प्रकारे अप्रत्यक्षपणे सहभागी होणेच असते. असा अप्रत्यक्ष सहभागही प्रशासनाच्या कार्यक्षमतेसाठी महत्त्वाचा ठरत असतो. प्रभावी सहभागासाठी सुयोग्य आणि सुजाण राजकीय नेतृत्त्व, विवेकी सरकारी कर्मचारीवर्ग आणि सहकार्यप्रवण आणि सुज्ञ सामान्य जनता असणे आवश्यक आहे. एकमेकांच्या समस्यांची पूर्ण जाणीव असल्याशिवाय प्रशासकवर्ग आणि सामान्य जनतेचा यशस्वी सहभाग स्थापित होणार नाही. जनसहभाग या मार्यादा दूर करत असतो. मात्र ही प्रक्रिया वाटते तेवढी सोपी नाही या मार्गातही अनेक अडथळे असतात त्यांच्यावर मात करणे आवश्यक असते.

लोकप्रशासनातील जनसहभागाच्या मर्यादा

आधुनिक काळात दिवसेंदिवस शासन व प्रशासनाच्या ध्येय धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये जनतेच्या सक्रिय सहभागाची अधिकाधिक गरज निर्माण झालेली आहे; परंतु प्रभावी जनसहभागाच्या मार्गात अनेक अडथळे आहेत. प्रामुख्याने प्रशासकांची वृत्ती आणि संस्कृती ही मुळात जनविरोधी असेल, प्रशासकवर्ग जुलमी आणि औपचारिक असेल आणि त्याची भूमिका दुराग्रही आणि एकांगी असेल तर जनतेचे सहभाग व त्यांचे मते झुगारले जात असते. स्वातंत्रपूर्वीची भारतातील लोकशाही सामान्य जनतेला जबाबदार नव्हती, उलट उच्चवर्गाच्या हिसंबंधाचे रक्षण करणारी आणि परकीय राजवटीच्या फायद्यासाठी कार्य करत होती. स्वातंत्र्यानंतरसुद्धा नोकरशाहीच्या या मूळ प्रवृत्ती अजूनही बदललेल्या नाहीत. त्यामुळे नोकरशाही जनतेच्या सहभागाची दखल घेत नाही. दसऱ्या बाजूस जनतेच्या प्रभावी सहभागासाठी सुजाण आणि कर्तव्यतत्पर नागरिकांची गरज असते. प्रत्येक प्रश्नांविषयी त्यांनी जागरूक असले पाहिजे; परंतु वास्तवात आपल्या समाजात मोठ्या प्रमाणात निरक्षरता, अज्ञान, दारिद्र्य, बेरोजगारी आणि विषमता आहे. त्यामुळे सामान्य जनतेला प्रशासनात सहभागी होता येत नाही. त्यामुळे जनतेच्या प्रशासकीय निर्णय प्रक्रियेतील सहभागावर मोठ्या प्रमाणावर मर्यादा पडतात. नागरिकांमध्ये जागरूकता नसेल तर सहभागाचे महत्त्व त्यांना कळणार नाही. म्हणून सुज्ञ, सुजाण आणि जागरूक नागरिक असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सुयोग्य प्रभावी राजकीय नेतृत्वसुद्धा असणे महत्त्वाचे आहे. अपरिपक्व आणि अडाणी नेतृत्व असेल तर सामान्य माणसाला सत्तेत सहभागी करून

घेण्याची संधी मिळणार नाही. हुकूमशाही स्वरूपाच्या नेतृत्वाकडून लोकशाही वर्तनाची अपेक्षा करता येत नाही. स्वत:च्या हातात सत्तेचे केंद्रीकरण करून ते जनतेचे शोषण करतात आणि त्यांच्या आशा-आकांक्षा पूर्णत: डोळेझाक करतात.

शासन-प्रशसनाचे स्वरूप आणि जनसहभागाच्या औपचारीक-अनौपचारीक संधी, यावरसुद्धा जनतेचा सहभाग अवलंबून असतो. जेवढे जास्त केंद्रीकरण असेल, तेवढ्या प्रमाणावर जनतेच्या सहभागाच्या संधी कमी असतात. ज्या शासन व्यवस्थेत सत्तेचे जास्तीत जास्त प्रमाणावर विकेंद्रीकरण केले जाते तेथे जनतेचा प्रशासनात सहभाग जास्त असतो. भारतात पंचायतीराज स्थापनेमुळे जास्तीत जास्त जनसेवा ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमामध्ये प्रत्यक्ष सहभागी होण्याची, स्वत:च्या विकासाची योजना तयार करण्याची आणि विकास कार्यक्रम राबवण्याची संधी मिळाली आहे. पंचायतीराज व्यवस्था म्हणजे जनतेच्या सहभागाने ग्रामीण विकास साध्य करण्याची विकेंद्रीकरणाची व्यवस्था आहे. परंतु या संस्थाच्या समोरही अनेक समस्या आहेत ज्या जनसहभागाचा मार्गात अडथळा ठरतात. त्याचप्रमाणे जिल्हा नियोजन समित्या स्थापन केल्याने सामाजिक, आर्थिक नियोजनाच्या प्रक्रियेत तसेच पंचवार्षिक योजना तयार करण्याच्या, त्या राबविण्याच्या आणि त्यांच्या मूल्यमापनाच्या कामात जनतेला सहभागी करून घेतले जाते. नियोजनाची सुरुवात अगदी खालच्या स्तरावरून, जिल्हा पातळीवर जनतेच्या सहभागाने केल्याने योजना जास्त वास्तविक आणि उपयुक्त ठरतात, असे अपेक्षित असते मात्र; कठोर नियम आणि औपचारीकता प्रभावी जनसहभागावर बंधने टाकतात.

सर्वसाधारण नागरिकांमधील निरक्षरता, अज्ञान, गरिबी, बेकारी आणि निरुत्साह या कारणांमुळे जनतेच्या प्रशासनातील सहभागावर मर्यादा पडतात; परंतु असे असले तरी साधारण नागरिक शासनात आणि प्रशासनात सहभाग घेतच असतो. प्रशासनात किंवा शासनात, निर्णय प्रक्रियेत किंवा निर्णय अंमलबजावणीत, प्रत्यक्ष किंवा परोक्ष, औपचारिक किंवा अनौपचारिक कोणत्याही प्रकारे नागरिकांचा प्रशासनात सहभाग असणे लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी आवश्यक असते. नागरिकांचा सहभाग जेवढा प्रभावी असेल, तेवढेच प्रशासन कार्यक्षम आणि प्रभावी होईल. यासाठी शासनाने जाणीवपूर्वक जनतेमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. तसेच जनसहभागाचे सर्वसमावेशक प्रारुप तयार करून शासन व प्रशासनाच्या कार्यप्रक्रियेत जनसहभाग वाढविल्यास शासनाच्या व

प्रशासनाच्या कामाची गुणवत्ता वाढवूण प्रशासन कार्यक्षम, पारदर्शक, संवेदनशील व जबाबदार बनेल आणि लोकशाही शासन व्यवस्थेचा उद्देश सफल होण्यास मदत होईल.

संदर्भ :

१. Appleby Paul, (1951), Public Administration for a Welfare State Bombay.

२. Arora Remesh Kumar, Mehata, (1979), 'People's Participaltion in Development Process', HCM State Institute of Public Administration, The University of Michigan.

३. Avasthi & maheshwari, (1995), Public Administration, Laxmi Narain Publication, Agra.

४. Bawa Noorjahan, (1984), 'People's Paticipation in Development Administration in India', Upphal, New Delhi.

५. Goel S.L. (2003), Advanced Public Administration, Deep & Deed Publications Pvt. Ltd. New Delhi.

६. Robert T. Reilly, (1987), 'Public Relations in Action', Prentice-Hall, Inc., America, New Jorsey, R.

७. बोरा, शिरसाठ, (२०१३), 'लोकप्रशासनशास्त्रे', विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

८. फडिया एवं फडिया, (२००१), उच्चतर लोकप्रशासन, साहित्य भवन पब्लिकेशन, आग्रा.

९. सिन्हा मनोज, (२०१०), 'प्रशासन एवं लोकप्रतितनीधी', ओडियंट ब्लैकस्वॉन, हैद्राबाद.

१०. शर्मा एवं सडाना, (२००१), लोकप्रशासन, सिद्धांत एवं व्यवहार, किताब महल पब्लिकेशन, इलाहाबाद.

http://www.ksijmr.com